ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT.
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १० पुणें, बुधवार तारीख ७ एप्रिल, १९५४ अंक १४

## विविध माहिती

**सारनाथ येथें वेधशाळा**—सारनाथजवळ खगोलशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी एक वेधशाळा बांधण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. वेधशाळेसाठी जागा मुक्रर करण्यांत आली असून सरकारनें ती ताब्यांतहि घेतली आहे. बनारस येथील संस्कृत कॉलेजच्या विद्यमानें शाळेचें काम चालणार आहे. एक मोठी दुर्बिण व इतर सामुग्री ह्यांची खरेदी पूर्वींच झाली आहे.

**सगळ्यांत अधिक दाटीचें शहर**—कलकत्ता शहरांत भारतामधील कोणत्याहि शहरापेक्षा अधिक दाट लोकवस्ती आहे, असें समजतें. कलकत्त्यांत दर चौरस मैलांत ७८,८५८ माणसें दाटीवाटीनें राहात आहेत. मद्रास शहरांत दर चौरस मैलांत २८,९४० आणि मुंबई शहरांत २५,५९८ माणसें वस्ती करून आहेत.

**हातमागाच्या धंद्याला कर्ज**—प. बंगालमधील हातमागाच्या धंद्याचा विकास घडवून आणण्यासाठी भारतीय सरकारनें आणखी १० लाख रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. ह्या कर्जावर व्याज घेण्यांत येणार नाहीं. त्या राज्यांत सध्या सुताचें वांटप करणाऱ्या ज्या सहकारी संस्था आहेत आणि ज्यांना हातमागाच्या कापडाचें उत्पादन करावयाचें आहे, अशांना वरील रकमेंतून कर्जें देण्यांत येतील.

**सूर्य-चुल्यांचें उत्पादन**—भारतीय सरकारच्या शास्त्रीय संशोधन खात्यानें सूर्याच्या उष्णतेचा उपयोग करून घेणारे चुले बनविले होते. हे चुले तयार करण्याचा मक्ता कलकत्त्यांतील एका कंपनीला आणि मुंबईमधील एका कंपनीला देण्यांत आला आहे. आतांपर्यंत २६४ सूर्यचुले करण्यांत आले व त्यांतील २२७ चुले विकण्यांत आले.

**रिहंड योजनेला मदत**—रिहंड येथील पाटबंधाऱ्याच्या योजनेला अमेरिकेकडून तांत्रिक मदत मिळणार आहे. ह्या योजनेंत वीज उत्पादन करण्याचीहि व्यवस्था आहे. तांत्रिक मदतीच्या कराराप्रमाणें अमेरिकन टेकनिकल कोऑपरेशन मिशनकडून १·१ कोटी डॉलर्स अथवा ५·२५ कोटी रुपये मिळणार आहेत.

**विवाहावर कर बसविला**—दिब्रुगड विभागांतील एका ग्रामपंचायतीनें विवाहावर कर बसविण्यास सुरवात केली आहे. जो विवाह सार्वजनिक रीतीनें साजरा करण्यांत येईल त्यावर ५ रुपये कर आणि जो गांधर्व विधीनें करण्यांत येईल त्यावर अडीच रुपये कर घेण्यांत येणार आहे.

**२५,००० फुटांवर सांपडलेलें अस्वल**—न्यूझीलंडचे कांहीं गिर्यारोहक हिमालयावर २५ हजार फुटांवर गेले असतांना त्यांना ७ महिन्यांचें एक अस्वलाचें पिलूं मिळालें. तें पकडून त्यांनीं बोटीनें न्यूझीलंडला रवाना केलें आहे.

**भारतीय रेल्वेंचा कोळशावरील खर्च**—१९५२-५३ सालीं भारतीय रेल्वेजनीं कोळशासाठी दररोज सरासरी ५,००,००० रुपये खर्च केला. ह्या रकमेंत वहातुकीचा खर्च, एक्साइज कर, विक्रीकर, इत्यादींचा समावेश करण्यांत आलेला नाहीं.

**अ. भारतीय संस्थेला मदत**—ऑल इंडिआ वुइमेन्स फुड कौन्सिल ह्या संस्थेला भारतीय सरकारनें १९५१ते १९५४ मार्च अखेर पर्यंत ४,५०,००० रुपयांची मदत केली असल्याचें समजतें. ह्या संस्थेतर्फे मोठमोठ्या शहरांतून आणि कांहीं रेल्वे गाड्यांतून स्वस्त अन्नपदार्थांचीं होटेल्स चालविण्यांत येत आहेत.

**पाकिस्तानच्या चलनाची किंमत**—पूर्व पाकिस्तानांतील निवडणुकांत संयुक्त आघाडीनें मुस्लीम लीगचा पराभव केल्यामुळें खाजगी व्यवहारांत पाकिस्तानच्या चलनाची किंमत वाढली आहे. पूर्वी १०० पाकिस्तानी रुपयांना ७५ भारतीय रुपये मिळत असत. आतां १०० पाकिस्तानी रुपयांना ८४ भारतीय रुपये मिळूं लागले आहेत.

**भारतीय कथेचा उपयोग**—सो. रशिआंतील एका स्टुडिओंत मुलांसाठी एक व्यंगचित्र तयार करण्यांत येत आहे. ह्या व्यंगचित्राची कथा म्हणून एका भारतीय परीच्या गोष्टीची निवड करण्यांत आली आहे. कथेचें नांव 'सोन्याचें हरीण' असें असून तिचें चित्रीकरण ह्याच वर्षी पूर्ण करण्यांत येईल.

**शिशापासून चांदीची निर्मिति**—मेटल कॉर्पोरेशन ऑफ इंडिआ ह्या कंपनीनें शिशाच्या खनिजापासून चांदी तयार करण्याचा एक कारखाना कत्रासगड येथें उभारला आहे. ह्या कारखान्यांत दर महिन्याला ३०,००० औंस चांदी निर्माण होऊं शकेल. आतांपर्यंत सुमारें १० मण चांदीचें उत्पादन करण्यांत आलें आहे.

**कच्छमधील धरण व कालवे**—पंचवार्षिक कार्यक्रमांतील योजनेप्रमाणें कच्छमधील ११ व्या कामाची रूपरेषा आतां निश्चित करण्यांत आली आहे. बालापूर-बुदाधरा असें ह्या योजनेचें नांव असून तीवर ७·६ लाख रुपये खर्च होणार आहेत. भारत सरकारच्या मंजुरीसाठी ती आतां योग्य त्या खात्याकडे पाठविण्यांत आली आहे.

**इजिप्तच्या कापसाची खरेदी**—सप्टेंबर १९५३ ते १८ मार्च १९५४ पर्यंतच्या हंगामांत भारतानें इजिप्तपासून ५,२४,९६९ कंतार कापूस विकत घेतला. कापसाच्या खरेदीच्या क्रमांकांत ब्रिटनचा नंबर पहिला लागतो आणि भारताचा दुसरा लागतो. वरील कालखंडांत ब्रिटननें इजिप्तपासून ६,०१,२४१ कंतार कापूस विकत घेतला.

**सरकारी कचेऱ्यांसाठीं नवी इमारत**—दिल्ली येथें सरकारी कचेऱ्यांसाठीं एक मोठी इमारत सध्या व्हिक्टोरिया रोडवर उभारण्यांत येत आहे. अशाच प्रकारची बरेच मजले असलेली दुसरी इमारत किंग एडवर्ड रोडवर बांधण्याचें भारतीय सरकारनें ठरविलें आहे. नवीन इमारत ६ मजली होईल आणि तिला सुमारें ३४ लाख रुपये खर्च येईल. इमारतीच्या कामाला लवकरच प्रारंभ होईल.

**कृत्रिम अभ्रकाचें उत्पादन**—अमेरिकेंतील मिकेलॅक्स कॉर्पोरेशन नांवाच्या कंपनीनें कृत्रिम अभ्रक मोठ्या प्रमाणावर तयार करण्याचें ठरविलें आहे. ह्या बाबतींत करण्यांत आलेले प्रयोग यशस्वी झाले असून नैसर्गिक अभ्रकापेक्षा कृत्रिम अभ्रकाचे खडे अधिक मोठे होऊं शकतात, असें आढळून आलें आहे. ह्या शोधामुळें भारताच्या अभ्रकाच्या मक्तेदारीला धोका निर्माण झालेला आहे.

**बोटी बांधण्याचा धंदा मंदींत**—अमेरिकेंतील शिप-बिल्डिंग कौन्सिलनें जाहीर केलें आहे कीं, गेले १४ महिने हा धंदा मंदीला तोंड देत आहे. ह्या कालांत एकाहि नव्या बोटीच्या बांधणीची मागणी करण्यांत आलेली नाहीं. सध्यां अमेरिकेंत अवघ्या ३९ बोटींच्या बांधणीचें काम चालू आहे. एक वर्षापूर्वी ८५ बोटी बांधल्या जात होत्या. नवीन मागणी येण्याचीं चिन्हेंहि दिसत नसल्याचें नमूद करण्यांत आलें आहे.

**नेपाळला भारत सरकारची मदत**—भारतीय सरकारनें नेपाळ सरकारला २ कोटी रुपयांची मदत देण्याचें ठरविलें आहे. ही रक्कम मुख्यतः रस्ते, वैमानिक वहातूक, छोटे पाटबंधारे ह्या कामावर खर्च होणार आहे असें समजतें. भारतानें द. आशिआ आणि आग्नेय आशियामधील देशांनाहि कोलंबो योजनेप्रमाणें मदत केली आहे. भारतानें ६ तज्ज्ञ पुरविले आहेत आणि २०० परदेशी विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची व्यवस्था केली आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि. पुणें २

**"All Is Well That Ends Well"**

उसापासून साखर करण्याकरितां सरकार सिंडिकेटच्या उसाला पाणी देतें तेव्हां सिंडिकेटनें फक्त साखर करावी, मशिनरी २५० टनांची लहान या सबबीवर "सिंडिकेटनें उसापासून गूळ करूं नये" असा सरकारी हुकूम १९४३ सालीं सिंडिकेटवर बजावण्यांत आला.

**★ गूळबंदीच्या हुकुमाचा आज झालेला कायमचा फायदा ★**

एक हजार टनांची नवीन मशिनरी चालू होऊन साखरेचें उत्पादन पूर्वी पन्नास हजार पोतीं होत होतें तें आतां कायमचें एक लक्ष पोत्यांपर्यंत वाढलें आहे. नवीन मशिनरीकरितां घेतलेल्या (७०) लक्ष रुपयांच्या ठेवींपैकीं (५१) एकावन्न लक्ष रुपयांच्या ठेवी साखरविक्रींतून व्याजासह परत केल्या आहेत.

**सिंडिकेटच्या ठेवीदारांना धन्यवाद**

सत्तर लक्ष रुपये किमतीच्या नवीन मशिनरीवर बँका, फायनान्स कॉर्पोरेशन वगैरे कोणाचाहि बोजा नाहीं. नवीन मशिनरीच्या ठेवींना तारण आहे.

**पुढील हंगामांत साखरेच्या जोडीला "स्पिरिटचें" उत्पादन सुरू होईल.**

**ही उत्पादन-जोडी व्याजासह ठेवी परत करील.**

**ठेवींची मुदत वाढवून मिळत आहे; नवीन ठेवी येत आहेत.**

## ठेवींच्या व्याजाचे दर

**★ मुदत पांच वर्षें — व्याज ७॥ (साडेसात) टक्के.**

**★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ (सात) टक्के.**

**★ मुदत एक वर्ष — व्याज ६ (सहा) टक्के.**

**ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.**

९८० सदाशिव पेठ, लक्ष्मीपथ पुणें २.
दि. ३१-३-१९५४

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
मॅनेजिंग एजंट्स.

अर्थ

बुधवार, ता. ७ एप्रिल, १९५४



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## टाटा डिफर्डची रोमांचकारक कारकीर्द

### शेअरबाजाराचा राजा पदच्युत झाला

टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचा डिफर्ड शेअर गेल्या महिन्याचे अखेरीस, दि. २६ मार्च रोजीं, ऑर्डिनरी शेअर्समध्यें विलीन झाला व ज्या शेअरनें हजारोंना श्रीमंत केलें व हजारोंना दरिद्री बनविलें, असा हा प्रसिद्ध शेअर इतिहासजमा झाला. त्यानें आपली कारकीर्द पुष्कळच गाजविली व नेतेपण कायम ठेवून आपल्या चढ-उताराप्रमाणें सबंद शेअरबाजार हलवून सोडला. टाटा डिफर्डची मूळ किंमत फक्त ३० रुपये; परंतु ज्यांनीं तो कंपनीकडून घेतला त्यांना आजवर २,००० रुपयांपेक्षा अधिक रकम डिव्हिडंड रूपानें मिळाली आहे व आतां शेअरच्या बद्दली ७५ रुपयेवाले बारा ऑर्डिनरी शेअर्स मिळणार आहेत. एक डिफर्ड = सहा ऑर्डिनरी हें प्रमाण मध्यस्त श्री. सेटलवाड ह्यांनीं ठरवून दिलें आहे त्याप्रमाणें सहा शेअर्स मिळतील आणि प्रत्येक एका ऑर्डिनरी शेअरला एक बोनस शेअर असे सहा शेअर्स मिळतील. म्हणजे, एका डिफर्डच्या बद्दली बारा ऑर्डिनरी शेअर्स हातीं येतील.

टाटा डिफर्डच्या किंमतीमधील चढउतारास जगांतील इतर कोठेंहि तोड नव्हती, असें म्हणतात. १९२५ मध्यें हा शेअर २६ रु. १४ आ. किंमतीस मिळत होता. टाटा कंपनीनें प्रत्येक डिफर्ड शेअरवर २७० रु. वाढावा घेऊन २६,२५० शेअर्स १९१७ सालीं विकल्यानंतर आठच वर्षांनीं ही अवस्था आली. कारण, १९२१ पूर्वी ज्या ३० रु. च्या डिफर्डला ६० रु. १३ आ. ४ पै व त्यापूर्वी कांहीं काळ ८७ रु. ८ आ. डिव्हिडंड मिळालें, त्याच शेअरवर १९२१ ते १९३५ एक पैहि डिव्हिडंड सुटलें नाहीं !

१९३३ मध्यें त्याची किंमत १३२ रु. आणि ९३२ रु. ह्यांचे दरम्यान होती, ती १९३७ मध्यें २,२९० रुपयांवर गेली. १९३८ मध्यें ती ७९५ रु. वर घसरली. दुसऱ्या महायुद्धाचे अखेरीस टाटा डिफर्डनें ३,६४० रु. चें शिखर गांठलें, परंतु एकाच वर्षांत त्याची किंमत १,५७५ रु. वर आली. त्याचा अस्त होण्याचे आधीं ती २,२०० रु. च्या आसपास होती.

कंपनीच्या एकूण १०-४७ कोटी रु. वसूल भांडवलापैकीं डिफर्ड शेअर्सची रकम फक्त १४,६२,५०० रु. होती. असें असतांनाहि ह्या शेअरला महत्त्व प्राप्त होण्याचें कारण असें, कीं पहिल्या व दुसऱ्या प्रेफरन्स भागांवरील ठराविक दरानें डिव्हिडंड वाटून झाल्यावर उरणारा नफा २६२·५० लक्ष रुपयांचें ऑर्डिनरी भांडवल व १४·६२ लक्ष रुपयांचें डिफर्ड भांडवल ह्यांत जवळ जवळ सम हिश्यानें विभागला जाई. सहाजीकच, लहान रकमेच्या डिफर्डवरील डिव्हिडंडच्या दरांत नफ्याच्या रकमेच्या मानानें कितीतरी पट फरक पडे.

आतां डिफर्डचें रूपांतर ऑर्डिनरींत झाल्यानंतर व बोनस शेअर्स दिल्यानंतर कंपनीचें भांडवल १७,३८,७५,००० रुपये होईल व प्रत्येकीं ७५ रुपयांच्या १२,८५,००० भागांत विभागलें जाईल. रिझर्व्ह फंड ११ कोटी रुपये होता, तो ४,१३,३७,५०० रुपये राहील. कंपनीची उत्पादनक्षमता ७,५०,००० टनांपासून ९,३०,००० टनांपर्यंत वाढविण्यांत येणार आहे. त्यासाठीं भांडवल वाढविण्यास हवें. पण, डिफर्डवाल्यांच्या अधिकारांवर आक्रमण केल्याखेरीज तें शक्य होईना आणि भांडवलाची पुनर्रचना केल्याविना सरकार कर्ज मंजूर करण्यास तयार होईना. म्हणून, डिफर्डचें रूपांतर आवश्यक झालें व त्यासाठीं दीर्घकाळ वाटाघाटी व तडजोडी कराव्या लागल्या. १९०७ सालीं कंपनी स्थापन झाली, त्यावेळीं ऑर्डिनरी बरोबर डिफर्ड शेअर्स विकण्यांत आले. त्यानंतर १९१८ मध्यें कंपनीची वाढ करतेवेळीं आणखी डिफर्ड शेअर्स विक्रीस काढले. आतां वाढ करतांना मात्र, ह्या शेअर्सचें ऑर्डिनरींत विलिनीकरण करावें लागलें आहे.

---

### आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धागेदोरे

आंतरराष्ट्रीय व्यापाराचे धागेदोरे एकमेकांत कसे बेमालूम गुंतलेले असतात ह्याचें प्रत्यंतर रशिआ व ब्रिटन ह्यांच्या दरम्यान अधिक व्यापार करण्याच्या प्रयत्नांत दिसून येत आहे. भारताच्या निर्यात व्यापारावर ह्या वाटाघाटींच्या फलश्रुतीचा परिणाम होण्याचा संभव आहे. ब्रिटनच्या व्यापार-खात्यानें असें जाहीर केलें आहे कीं ब्रिटनची बाजारपेठ रशिआच्या धान्य, लाकूड, खनिजें आणि मँगेनीझ ह्या मालाला खुली आहे. ह्या यादींपैकीं मँगेनीझचा उल्लेख भारताच्या दृष्टीनें महत्त्वाचा आहे. भारताकडून ब्रिटन बऱ्याच मोठ्या प्रमाणावर मँगेनीझची खरेदी करतें. १९५३ च्या मार्च अखेर संपलेल्या वर्षांत भारतानें १३,६४,९३१ टन मँगेनीझ निर्यात केलें. ह्या निर्यातीमुळें भारताला २०·७७ कोटी रुपयांचा लाभ झाला. त्यापूर्वीच्या वर्षांत भारतानें ११,२४,५५६ टन मँगेनीझ निर्यात करून १५·६९ कोटी रुपये मिळविले होते. एकूण निर्यातीपैकीं ब्रिटननें १९५३ सालीं १,३६,५८४ टन मँगेनीझ घेतलें. त्याची किंमत २·२४ कोटी रुपये झाली. त्यापूर्वीच्या वर्षांत भारतानें ब्रिटनला १,१४,६२४ टन मँगेनीझ पुरवून १·५६ कोटी रुपये मिळविले होते. एप्रिल ते सप्टेंबर १९५३ ह्या सहा महिन्यांत ब्रिटननें ७५,४४९ टन मँगेनीझ भारताकडून आयात केलें आणि त्याबद्दल १·३६ कोटी रुपये दिलें. त्यापूर्वीच्या वर्षांतील ह्याच सहामाहीचे आंकडे ६७,८४१ टन आणि १·०४ कोटी रुपये असे आहेत. ब्रिटननें रशिआकडून मँगेनीझची आयात करण्याचें ठरविलें तर त्याचा परिणाम भारताच्या ह्या खनिजाच्या निर्यातीवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. म्हणूनच एकसारख्या बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितींत नव्या बाजारपेठांचा शोध करीत राहणें आवश्यक होऊन बसतें.

# THE BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

*Balance Sheet as at 31st December, 1953.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Capital** | | | |
| **Authorised Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 50/-each ... | | | 5,00,000—0—0 |
| **Issued Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 50/-each ... | | | 5,00,000—0—0 |
| **Subscribed Capital** | | | |
| 10,000 Shares of Rs. 50/-each ... | | | 5,00,000—0—0 |
| **Amount Called up at Rs. 25/-per share :** ... | | | 2,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** | | | |
| Reserve fund ... | | 41,707—2—0 | |
| Investment Reserve Fund ... | | | |
| Balance as per last B/s. | 29,380-6-0 | | |
| Less Loss on sale of investments during the year, adjusted | 5,250-0-0 | 24,130—6—0 | |
| Investment Fluctuation Fund ... | | 3,534—8—0 | 69,372—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | | |
| Fixed Deposits ... | | 4,05,783—5—6 | |
| Savings Bank Deposits ... | | 4,94,784—7—1 | |
| Current Accounts, Contingency Accounts, etc. ... | | 2,89,037-11—1 | 11,89,605—7—8 |
| **4 Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | | |
| (*i*) In India ... | | 3,56,368-11-11 | |
| (*ii*) Outside India ... | | Nil | 3,56,368-11-11 |
| **Particulars** | | | |
| (*i*) Secured against Government Securities shown per contra ... | | 3,56,368-11-11 | |
| (*ii*) Unsecured ... | | Nil | |
| **5. Bills Payable** | | 0—0—0 | Nil |
| **6. Bills For Collection being Bills Receivable as per Contra** | | | |
| (*i*) Payable in India ... | | 8,612—1—3 | |
| (*ii*) Payable outside India ... | | 67—8—0 | 8,679—9—3 |
| **7. Other Liabilities** | | | |
| (*i*) For Expenses ... | | 450—0—0 | |
| (*ii*) Provident Fund partly invested as per contra ... | | 8,291—1—8 | |
| (*iii*) Unpaid Dividents ... | | 3,368—9—8 | |
| (*iv*) Branch Adjustments ... | | 4,168-11—9 | 16,278—7—1 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations per Contra** | | 0—0—0 | Nil |
| **9. Profit and Loss** | | | |
| Profit as per last B/Sheet | 7,163-13—2 | | |
| Less : Appropriations :— | | | |
| Reserve fund 1,450—0—0 | | | |
| Dividends 5,625—0—0 | 7,075—0—0 | 88-13—2 | |
| Add: Net profit for the year (subject to taxation) brought from the Profit and Loss Account. | | 514-14—4 | 603-11—6 |
| **10. Contingent Liabilities** | | | Nil |
| Total Rs. ... | | | 18,90,907-15—5 |

( See Profit and Loss Account on Page 112 )

# THE BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

*Balance Sheet as at 31st December 1953*

## PROPERTY AND ASSETS

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Cash** | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank (including Foreign Currency Notes) ... | | 2,10,862-15—1 |
| **2. Balances with Other Banks** (in current accounts) | | |
| (*i*) In India ... | 1,901—7—4 | |
| (*ii*) Outside India ... | Nil | 1,901—7—4 |
| **3. Money At Call And Short Notice** | 0—0—0 | Nil |
| **4. Investments at Cost** (Face value 8,62,800) | | |
| (*i*) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments ... | 8,65,645—0—0 | |
| (Of these, Securities of the face value of Rs. 7,700/- are earmarked for Provident Fund as per contra. Average Market Value Rs. 8,03,541-12-0. Some of these Securities of the face value of Rs. 6,50,000/- are lodged with Banking Companies for overdraft arrangement). ... | | |
| (*ii*) Shares: Ordinary Shares fully paid of the face value of Rs. 100/- ... | 145—0—0 | |
| (Market Price Rs. 145/-) | | |
| (*iii*) Debentures or Bonds ... | Nil | |
| (*iv*) Other Investments ... | Nil | |
| (*v*) Gold ... | Nil | 8,65,790—0—0 |
| **5. Advances** | | |
| (Other than bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors). | | |
| (*i*) Loans, Cash Credits, Overdrafts, etc. | | |
| (*i*) In India ... | 7,59,306—3—0 | |
| (*ii*) Outside India ... | Nil | |
| (*ii*) Bills Discounted and Purchased, (excluding Treasury Bills of the Central & State Governments). | | |
| (*i*) Payable in India ... | 5,000—0—0 | |
| (*ii*) Payable outside India. ... | Nil | 7,64,306—3—0 |
| **Particulars Of Advances** (*See Page 112*) | | |
| **6. Bills Receivable, Being Bills for Collection as per Contra** | | |
| (*i*) Payable in India ... | 8,612—1—3 | |
| (*ii*) Payable outside India ... | 67—8—0 | 8,679—9—3 |
| **7. Constituent's Liabilities for Acceptances, Endrosements and Other Obligations per Contra** | | Nil |
| **8. Premises Less Depreciation** | | Nil |
| **9. Furniture and Fixtures at Cost** ... | 23,061—9—9 | |
| Additions ... | 166—9—0 | |
| Less written off 6—0—0 | 23,228—2—9 | |
| Less Depreciation 11,276-11—0 | 11,282-11—0 | 11,945—7—9 |
| **10. Other Assets Including Silver** | | |
| (*i*) Interest on Investments accruing but not due and interest outstanding ... | 6,318—0—0 | |
| (*ii*) Income Tax paid at source ... | 7,625—1—0 | |
| (*iii*) Sundry Debtors (10,000/- being considered doubtful and not provided for) ... | 13,479—4—0 | |
| (*iv*) Bills Receivable ... | | 27,422—5—0 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** | | Nil |
| **12. Profit and Loss Account** | | Nil |
| Total Rs. ... | | 18,90,907-15—5 |

(See Profit and Loss Account on Page 112)

# THE BHOR STATE BANK LIMITED, BHOR.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1953 on page 111**

| Particulars of Advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|
| (i) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 4,64,731—9—9 |
| (ii) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 2,27,398—7—9 |
| (iii) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties in addition to the personal security of the Debtors. ... | Nil |
| (iv) Debts considered doubtful or bad, not provided for. ... | 72,176—1—6 |
| | 7,64,306—3—0 |
| (v) Debts due by Directors or Officers, of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | Nil |
| (vi) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, partners or managing agents, or in the case of private companies as members. ... | 3,126—2—0 |
| (vii) Maximum total amount of advance, including temporary advance made at any time during the year to Directors or managers or officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | Nil |
| (viii) Maximum total amount of advance, including temporary advance granted during the year to the Companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as directors, partners or managing agents or in the case of private companies as members. ... | 3,807—6—0 |
| (ix) Due from Banking Companies. ... | Nil |

***Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1953***

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | INCOME | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| 1. Interest paid on Deposits, borrowings, etc. ... | 29,635-11—0 | 1. Interesest and Discount. ... | 71,677-12—1 |
| 2. Salaries and allowances and Provident Fund. ... | 23,672—3—4 | 2. Commission, Exchange and Brokerage. ... | 1,520-13-11 |
| Manager and Chief Executive Officer. 4,747—8—0 | | 3. Rents. ... | Nil |
| Others. 18,924-11—4 | | 4. Net Profit on sale of Investments, gold and silver, land and premises and other (Not credited to Reserves or any particular fund or account) | Nil |
| 3. Directors's & Local Committee Members' fees and allowances. ... | 3,426—0—0 | 5. Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets (Not credited to Reserves or any particular fund or account.) ... | Nil |
| 4. Rent, Tax, Insurance, Lighting, etc. | 4,092—4—6 | | |
| 5. Law Charges. ... | Nil | | |
| 6. Postage, Telegrams and Stamps... | 875—9—0 | | |
| 7. Auditors' Fees. ... | 350—0—0 | | |
| 8. Depreciation on and repairs to the Banking Company's property. | 1,285-15—0 | 6. Income from Non-Banking assets and Profit from sale of or dealing with such assets. ... | Nil |
| 9. Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 1,679--2—1 | 7. Other Receipts. | |
| 10. Loss from sale of or dealing with non-banking assets. ... | Nil | Share Transfer Fees and splitting charges. 14-12-0 | |
| 11. Other Expenditure : | | Safe Custody Charges. 266—0-0 | |
| Sundry Charges 812-1-0 | | Sundry Charges & other Charges. 464-14-3 | |
| Travelling & Conveyance 895-11-0 | 1,707-12--0 | Supervision Charges 1,373—6-0 | 2,119—0—3 |
| 12. Balance of Profit (Subject to Taxation) carried down. ... | 8,593—1—4 | | |
| Total Rs. ... | 75,317-10—3 | Total Rs. ... | 75,317-10—3 |

| | | | |
|---|---|---|---|
| To, Adjustment of taxes for assessment years 1949-50 to 1953-54. ... | 8,078—3—0 | *By* Balance of Profit during the year brought down. | 8,593-1-4 |
| To, Net Profit (Subject to Taxation) during the year carried to Balance Sheet. ... | 514-14-4 | | |
| | 8,593—1—4 | | 8,593-1-4 |

**N. V. Pandav,** *Manager* **Y. S. Joshi,** *Asstt. Manager* **M. V. Shingre,** *Chairman*

SHIRVAL, 28th Feb. 1954

**N. P. Thopate,** (*Vice Chairman*)
K. V. Kelkar

Y. D. Khole
B. G. Dhanduke
C. R. Rathi } *Directors*

## REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of the Bhor State Bank Ltd. Bhor, as at 31st December, 1953 and also the above Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the certified returns of the Branches and report that :

(*a*) We have obtained all the information and explanations we have required; (*b*) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law; (*c*) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of the Bank's affairs according to the best of our information and the explanations given to us and as shown by the Books of the Bank; and (*d*) in our opinion, Books of Account have been kept by the Bank as required by Section 130 of the Indian Companies Act.

We have to report further that; (*e*) The information and explanations required by us have been found to be satisfactory; (*f*) The transactions of the Bank which have come to our notice, in our opinion, have been within the powers of the Bank; (*g*) The returns received form the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of this audit; (*h*) The Profit and Loss Account, in our opinion, shows a true balance of profit for the period covered by such account.

Poona GADRE and BHIDE, *Chartered Accountants.*

(See Balance Sheet on Page 110 and 111)

## दि बँक ऑफ सिटिझन्स लि. बेळगांव

### वार्षिक सभचा वृत्तांत

या बँकेच्या भागीदारांची १७ वी वार्षिक सभा बँकेच्या मुख्य कचेरींत, १५१४ मारुतिगल्ली येथें, रविवार ता. २८-३-५४ रोजीं सायंकाळीं ४ वाजतां भरली होती.

त्यावेळीं सुमारें ७० भागीदार हजर होते. सर्व डायरेक्टर मंडळी व श्री. बी. एस्. आरगांवी एम्. एल्. ए., रावसाहेब पी. एच्. वागळे, श्री. जी. डी. तिनईकर, श्री. एस्. एम्. गौरी, श्री. सी. जी. हेरेकर. श्री. बाबूराव ठाकूर, लोकमताचे संपादक श्री. सावंत व जनजीवाळचे संपादक श्री. एळकोटी वगैरे मंडळी हजर होती.

श्री. जी. डी. सराफ यांनीं अध्यक्षस्थान घेतलें व सभेचें कामास सुरवात झाली. नंतर श्री. पी बी. उगरगोळ व श्री. एम्. एस. होसमनी यांचीं समयोचित आर्थिक परिस्थितीवर भाषणें झालीं.

नंतर डायरेक्टर्स व ऑडिटर्स यांच्या रिपोर्टसह ताळेबंद व नफातोटा पास झाल्यावर भागिदारांनीं ४ टक्के करमाफ डिव्हिडंड देणेचा ठराव पास झाला. श्री. वाय. जी. नागांवकर, श्री पी. बी. उगरगोळ व श्री एम्. एस. होसमनी यांची पुन्हां डायरेक्टर म्हणून निवडणूक झाली. नंतर अल्पोपहार होऊन सभा बरखास्त झाली.

तावडतोब बोर्ड ऑफ डायरेक्टर्सची सभा होऊन श्री. जी. डी. सराफ हे १९५४-५५ सालासाठीं बँकेचे पुन्हां चेअरमन झाल्याचें जाहीर करणेंत आलें.

## श्री. जी. डी. सराफ यांचें अध्यक्षीय भाषण

"ही बँक आज १८ व्या वर्षांत पदार्पण करीत आहे व आज या बँकेचें शेअरभांडवल ३,९९,७००।-, रिझर्व्हे फंड १,२५,१००।- व त्याचप्रमाणें एकूण ठेवी ३५,१९,२००।- व खेळतें भांडवल ३९,२१,६००।- येवढें आहे. या वर्षी बँकेला एकंदर खर्च वजा जाऊन रु. २३,४०२।- निव्वळ नफा झाला आहे. त्यापैकी रु. १५,३४६ भागिदारांना ४ टक्के करमाफ डिव्हिडंड देण्याचें ठरविलें असून रु. ७,२००।- निरनिराळ्या फंडांत जमा करावेत अशी डायरेक्टर बोर्डानें शिफारस केली आहे. या वर्षी बँकेची उल्लेखनीय कामगिरी म्हणजे बैलहोंगल येथें बँकेनें आपली स्वतःची इमारत केली आहे व बेळगांवातहि स्वतःची भव्य इमारत करणेचा विचार आहे. या वर्षी मुदती ठेवी व सेव्हिंग्ज डिपॉझिटमध्यें बरीच वाढ झाली असून त्यावरून जनतेचा या बँकेवरील विश्वास वाढत आहे असें दिसून येतें. बेळगांव, धारवाड, कारवार, विजापूर या चार जिल्ह्यांत बँकेच्या एकूण १८ शाखा आहेत.

### डिपॉझिट इन्शुअरन्स योजना

"आजकाल सर्व आर्थिक व्यवहार सरकारी धोरणावर व सहानुभूतीवर अवलंबून असतात. लोकांच्या सहकार्यानें व सरकारी आपुलकीच्या धोरणानें काय करतां येणार नाहीं? अमेरिकेंतील "फेडरल डिपॉझिट इन्शुअरन्स स्कीम" प्रमाणें सरकारनें त्या योजनेचा पुरस्कार करून हिंदुस्थानांतहि "डिपॉझिट इन्शुअरन्स स्कीम" अमलांत आणल्यास आज बँकिंग क्षेत्रांत मोठी क्रांती होऊन सर्व बँकांमध्यें खात्रीनें ठेवींची वाढ होईल व बँकांवर लोकांचा विश्वास वाढेल. कारण, कोणत्याहि परिस्थितींत आपली ठेव सुरक्षित राहील याची जनतेला खात्री असते व आज लोकांच्या घरांत व खिशांत ज्या कोट्यवधी रुपयांच्या नोटा पडून आहेत त्यांचा व्यापारधंदे व शेती यांच्या उर्जितावस्थेसाठीं उपयोग करून घेतां येईल. तसेंच, रिझर्व्ह बँकेच्या, लोकांचे हातांत असलेल्या चलनाच्या पांचपट म्हणजे ५५००।- कोटी रुपये बँकांमध्यें ठेवी म्हणून येतील व या भांडवलावरती देशाची उर्जितावस्था होण्यास उशीर लागणार नाहीं. कारण, जास्त भांडवल-जास्त उत्पादन-बेकारी नष्ट व प्रत्येक माणशीं उत्पन्नांत वाढ. आज दरमाणशीं उत्पन्न रु. २६५ आहे तें रु. १३२५ होईल.

### आर्थिक समस्या

"लढाई संपल्यानंतर पुढील ५ वर्षांचे काळांत बाजाराची जी परिस्थिति होती त्याच्या अगदीं उलट परिस्थिति आज आपणांस दिसून येत आहे. आज बाजारांत माल ( धान्य व कपडा ) विपुल आहे परन्तु तो माल विकत घेण्यास सामान्य जनतेजवळ पैसा नाहीं, अशी परिस्थिति आज झाली आहे. ह्याचें मुख्य कारण म्हणजे सर्व तऱ्हेच्या मालाचें उत्पादन १९४६ पेक्षा सध्यां जवळ जवळ ३० टक्क्यांनीं जास्त आहे. त्या मानानें व्यवहारांतील पैसा सुमारें २ टक्क्यांनीं कमी झाला आहे. उत्पादनाप्रमाणें पैशाचाही त्याच प्रमाणांत वाढावा झाला पाहिजे, असें सर्वसामान्य आर्थिक शास्त्रांतील तत्त्व आहे. आतां त्यांतून मार्ग म्हणजे लोकांच्या हातीं पैसा जास्त जाईल असें केलें गेलें पाहिजे. त्याकरितां निरनिराळ्या योजनांवर ( सरकारी व खाजगी ) फार मोठ्या प्रमाणांवर पैसा खर्च करून ( रस्ते, शाळा, दवाखाने, धरणे औद्योगिक कारखाने, वगैरे ), तो पैसा लोकांच्या हातांत गेला पाहिजे. सरकारी व खाजगी जितका खर्च जास्त तितकी जास्त प्रमाणांत लोकांचे उत्पन्नांत वाढ म्हणजे उत्पादन वाढ व बेकारीस पायबंद व त्याच प्रमाणांत जास्त शिल्लक, म्हणजे जास्त प्रमाणांत बँकामध्यें ठेवी, जास्त प्रमाणांत ठेवी म्हणजे जास्त प्रमाणांत सरकारी कर्जरोख्यांत गुंतवणूक व जास्त प्रमाणांत बँकांची व्यापाऱ्यांस सवलत, अशा ही एक आर्थिक समस्या आहे. अशा रितीनें ही आर्थिक समस्या सोडविल्यास आपली पंचवार्षिक योजना सफल होण्यास वेळ लागणार नाहीं.

### उत्पादन वाढीबरोबर पैशाची वाढ

"नुकतेंच आपल्या हिंदुस्थानसरकारचें अंदाजपत्रक जाहीर झालें आहे व त्यावरून भांडवली खर्च ( विकासयोजनावरील ) हिशेबांत धरल्यास २५० कोटी रुपये तुटीचें आहे. ती तूट डिफिसिट फायनान्सनें म्हणजेच नोटा छापून काढण्याचें सरकारनें ठरविलें आहे. त्याचा परिणाम आपल्या आर्थिक स्थितीवर काय होईल असें विचारलें जातें. परंतु सरकारनें वेळींच सावधगिरी घेऊन उत्पादनवाढीबरोबर पैशाची वाढ केली नाहीं. आतां हिंदुस्थानांतील सर्व उत्पादन ३० टक्क्यांनीं वाढलें आहे व व रिझर्व्ह बँकेचें चलन ११०० कोटी रुपये लोकांचे हातीं आहे. त्यामध्यें ३० टक्क्यांनीं वाढ म्हणजे ३३० कोटी रुपये जरी नवीन नोटा छापून लोकांच्या हातीं दिल्या तरी हा वाढावा कोणत्याहि तऱ्हेनें घाऊक किंमतीच्या आकड्यांत ( आज ३९८ आहे. ) वाढ होऊं देणार नाहीं असें समजावें."

## मोर स्टेट बँक लि. पुणें

### श्री. म. त्र्यं. शिंगरे, चेअरमन, ह्यांचें भाषण

"चालू सालचे अहवालावरून आपणांस असें दिसून येईल कीं बँकेकडे सर्व ठेवी मिळून रु. ११,८९,६०५ होती. ही रकम १९५२ सालपेक्षा ७४,०७९ रकमेनें जास्त आहे. आर्थिक परिस्थिति तंग असतांनाहि ठेवीदारांनीं आपलेकडे ज्या रकमा ठेवल्या त्यावरून बँकेवर ठेवीदारांचा विश्वास आहे, असें दिसून येईल. वर्षाअखेर एकूण येणें कर्जें रु. ७,६४,३०६ चीं आहेत त्यापैकीं तारणी कर्जें रु. ४,६४,७३१ असून व्यक्तीचे तारणावर दिलेलीं कर्जें रु. २,२७,३९८ आहेत. यावरून आपणांस असें दिसून येईल कीं, बोर्डानें शक्य तेवढीं जास्तींत जास्त तारणी कर्जें दिलीं आहेत.

"आपल्या बँकेच्या अहवालाचे सालचे व्यवहारांत नफा रु. ८५९३-१-४ झाला. परंतु विलीनीकरणानंतर इन्कमटॅक्सचा हिशेब झाला व त्यामुळें ज्या सालाची आकारणी नक्की झाली त्या सालचा इन्कमटॅक्स चालू नफ्यांतून खर्चीं टाकला त्यामुळें यंदाचे सालीं भागीदार यांना नफा वाटतां येत नाहीं. आपल्या बोर्डाचा असा विश्वास आहे कीं, भागीदारांस पूर्वीप्रमाणेंच डिव्हिडंड देण्याचा प्रयत्न बोर्डाकडून होईल.

### ग्रामीण शाखांना सवलती

"समाज व देश यांच्या आर्थिक जीवनांत बँकांचें कांहीं विशिष्ट स्थान आहे व त्यादृष्टीनें लहान व मोठ्या बँकेचें स्वतंत्र क्षेत्र आहे पुष्कळशा प्रांतांत सावकार नियंत्रण कायदा झाल्यानें नागरी जीवनांतील लोकांच्या आर्थिक गरजा बँकांशिवाय कोणींहि सोडवूं शकत नाहींत व बँकांवरील कायद्याच्या बंधनांमुळें त्यांनाहि याबाबत फारसें करतां येत नाहीं. यामुळें मध्यमवर्गीय जनतेची फारच कुचंबणा होते. यासाठी बँकांच्या कार्यक्षेत्राबद्दल व त्यांच्या कार्याबद्दल निश्चित विचार व्हावयास पाहिजे. ज्या लहान बँकांच्या शाखा, कचेऱ्या ग्रामीण विभागांत आहेत त्यांना सरकारनें योग्य त्या सवलती द्यावयास पाहिजेत. स्थानिक स्वराज्य संस्थांचीं खातीं त्यांजकडे द्यावयास पाहिजेत. १९४८ च्या बँकिंग कायद्यामुळें शेड्यूल्ड व नॉन-शेड्यूल्ड असा फरक असण्याचें कारण नाहीं. अशा फरकामुळें व्यवहाराचे दृष्टीनें लहान बँकांची फारच कुचंबणा होते. तरी याबाबत रिझर्व्ह बँकेनें पुढाकार घेऊन शक्य तितक्या लौकर हा फरक दूर करावा. याशिवाय रिझर्व्ह बँकेनें जॉइंट स्टॉक बँकांना व मुख्यत: ज्यांच्या ग्रामीण भागांत बँकेच्या शाखा आहेत अशा बँकांना त्यांचे व्यवहारासाठीं सरकारी कर्जरोख्यांवर सवलतीचे दरानें ओव्हरड्राफ्ट देण्याची व्यवस्था करावी. बँकांना आपल्या खेळत्या भांडवलापैकीं बरीच रकम सरकारी कर्जरोख्यांत गुंतवावी लागते व जर रकम लागली तर इतर बँकांकडून ओव्हरड्राफ्ट घ्यावा लागतो व त्यास व्याजहि थोडें जास्त द्यावें लागतें. रिझर्व्ह बँक ही बँकांची बँक असल्यानें तिनें सवलतीचे दरानें रकम उपलब्ध केल्यास बँकांच्या खर्चांत बचत होईल.

"अलीकडे बँकेचे नोकरवर्ग यांना औद्योगिक कायदा लागल्यानें त्यांच्या मागणीबद्दल औद्योगिक लवादाकडे त्यांच्या मागण्या दाखल झाल्या व त्याप्रमाणें निवाडे झाले. या सर्वांचा अर्थ असा कीं, बँकांना अनेक कायदे व नियंत्रणें यास तोंड देऊन व्यवहार करावा लागणार आहे व त्यामुळें खर्चहि जास्त येणार आहे. सरकारनें बँकाविषयीं जे कायदे असतील त्यासंबंधीच्या व्यावहारिक अडचणी लक्षांत घेऊन नंतर कायदे अगर आपलें धोरण ठेवावें असें वाटतें. तरच आपल्या देशांतील बँकांना कार्य करण्यास योग्य ती संधि मिळून लोकांची व त्या द्वारां देशाची सेवा करण्याचें श्रेय मिळेल."


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. १०,७०,[illegible]००
ठेवी .... .... .... रु. १,१९,११,७००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,९४,५००
बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
शाखा:- दादर माहीम
शाखा:- बेळगांव पुणें
स्थापना १९१८


### आफ्रिकेंतील सोन्याची विक्री

द. आफ्रिकेच्या सरकारचे अर्थमंत्री मि. हॅवेंगा ह्यांनीं सरकारच्या मालकीच्या सोन्याच्या विक्रीविषयीं एक घोषणा केली आहे. साऊथ आफ्रिकन रिझर्व्ह बँक आपल्याजवळील सोन्याच्या सांठ्यापैकीं बराच सांठा लंडनच्या बाजारांत विकण्याचा विचार करीत आहे, असें त्यांनीं जाहीर केलें. ते पुढें म्हणाले कीं, ह्याचा अर्थ आमच्या सोन्याच्या उत्पादनापैकीं कांहीं भाग इतर कोठें विकणार नाहीं असा मात्र नाहीं; किंवा लंडनच्या बाजारांत मोठ्या प्रमाणावर सोनें विकण्यासाठीं पाठवून त्या बाजारावर ताण निर्माण करण्याचाहि सरकारचा विचार नाहीं. ब्रिटननें लंडनमधील सोन्याचा बाजार खुला करून पौंडाची देववेव अधिक मोकळी करण्याचा जो निर्णय घेतला आहे त्यासंबंधीं मि. हॅवेंगा हे बोलत होते. लंडनमधील बाजारांत सोनें विकण्याचें द. आफ्रिकेनें ठरविलें असलें तरी सोन्याच्या अधिकृत किंमतींत फरक करण्यांत येईल असें नाहीं. १९५४ सालीं ब्रिटनला ४० लाख औंस सोनें अगर तेवढ्या सोन्याच्या किंमतीचे डॉलर्स पुरविण्याचें द. आफ्रिकन सरकारनें मान्य केलें आहे. त्यावर वरील धोरणाचा कांहीं परिणाम होणार नाहीं लंडनमधील सोन्याचा बाजार खुला झाल्यानें द. आफ्रिकेला कांहीं फायदा होईल असें त्यांना वाटत नाहीं. पण त्यामुळें सोन्याची अधिकृत किंमत जरा लवकर वाढेल असा अंदाज आहे. द. आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणींना आपल्या उत्पादनांतील कांहीं भाग अधिकृत किंमतीपेक्षा अधिक किंमत घेऊन विकण्याची परवानगी असे. ह्यापुढें ती तशी राहणार नाहीं. १९४९ पूर्वी सोन्याच्या खाणी आपलें सर्व उत्पादन रिझर्व्ह बँकेला विकत असत. तीच पद्धत आतां पुन्हा चालू करण्यांत येणार आहे.

**मुंबईतील पेनिसिलिनचा कारखाना**—मुंबईमधील पेनिसिलिनच्या सरकारी कारखान्यांत येत्या सप्टेंबर महिन्यापासून उत्पादन होऊं लागेल असें समजतें. कारखान्याच्या बांधकामासाठीं सुमारें ५६ लाख रुपये आणि यंत्रसामुग्रीसाठीं ७८ लाख रुपये खर्च होतील असा अंदाज आहे. यंत्रसाहित्यापैकीं ४०,४६,००० रुपयांचें साहित्य संयुक्त-राष्ट्र-संघटनेतर्फे मिळालेलें आहे.

### अर्थशास्त्राचा अभ्यास : डॉ. मथाईचा इषारा

दिल्ली स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्यें भाषण करतांना डॉ. जॉन मथाई ह्यांनीं अर्थशास्त्राच्या शिक्षणाची भारतामधील विद्यापीठांतील परिस्थिति असमाधानकारक असल्याचें सांगितलें. डॉ. मथाई ह्यांच्यासारख्या विद्वान, अनुभवी व कर्तव्यदक्ष अर्थशास्त्रज्ञानेंच हें गौप्य फोडलें, हें बरें झालें. कारण, हिंदी विद्यापीठांतील अर्थशास्त्राच्या अध्यापनास व अध्ययनास व्यावहारिक जोड नसल्याची जुनी तक्रार आहे आणि ती तक्रार आतां अधिकच खरी ठरूं लागली आहे, असें दिसतें. सरकार आणि उद्योगपती हे अर्थशास्त्रज्ञांचा सल्ला अधिकाधिक घेऊं लागले आहेत; पण सल्ला देणारांच्या पात्रतेंत मात्र सुधारणा होत नसल्याची डॉ. मथाइची तक्रार आहे प्राध्यापकांपैकीं ज्यास्त हुशार असतील, ते भारी पगाराच्या नोकऱ्यांसाठी इतरत्र उचलले जातात व विद्यापीठांत दुय्यम दर्जाचे लोक शिकवण्याचें काम करीत रहातात; ह्याचा दुष्परिणाम कांहीं काळानें अधिकच स्पष्ट होईल. सरकारच्या कार्यक्षेत्रांत आर्थिक प्रश्नांचा व्याप वाढत चालला असतांना, ते हाताळण्यासाठी अर्थ-पक तज्ज्ञांवर अवलंबून राहावें लागलें तर फारच अडचणीचा प्रसंग पुढें निर्माण होईल, हें उघड आहे. सरकारनेंच ह्या बाबतींत पुढाकार घेऊन सुधारणा घडवून आणली पाहिजे.

### अर्थशास्त्र कसें शिकवावें ?

अर्थशास्त्र कसें शिकवावें ह्यासंबंधीं विचारविनिमय करण्यासाठीं विद्यापीठांतील प्राध्यापकांची एक परिषद् भारतीय सरकारच्या शिक्षण खात्यातर्फे भरविण्यांत आली होती. दोन दिवस चाललेल्या ह्या परिषदेचें उद्‌घाटन करतांना मध्यवर्ती शिक्षण खात्याचे चिटणीस, प्रा. हुमायून कबीर म्हणाले कीं विद्यापीठांत जें अर्थशास्त्र शिकविलें जातें तें बहुतेक सर्व पाश्चिमात्य देशांकडून इकडे आलेलें आहे. पण ही गोष्ट तितकीशी योग्य नाहीं. भारतामधील परिस्थितीची आणि विकासाच्या दिशेची अधिक निकटची जाणीव ठेवून अर्थशास्त्राचा अभ्यास होणें जरूरीचें आहे. भारत परवांपरवांपर्यंत परतंत्र होता. आतां तो स्वतंत्र झाला असून नियंत्रित अर्थव्यवस्थेच्या साह्यानें शेतीप्रधान आर्थिक रचनेच्या ऐवजी उद्योगप्रधान अर्थरचनेच्या दिशेनें पाऊलें टाकूं लागला आहे. धंद्यांची वाढ खुंटलेली असल्यामुळें आपल्या प्रगतीचा वेग वाढविण्याची जरूर आहे. ह्या सर्व परिस्थितीचा विचार करतां अर्थशास्त्राच्या शिकवणीला नवीन दिशा लावणें तांतडीचें झालें आहे. पण त्याचबरोबर अभ्यासाच्या दर्जांत कमतरता आणूं न देता अर्थशास्त्राची इतर मानवविषयक शास्त्रांशीं सांगड घालण्यांत आली पाहिजे. ह्या परिषदेला २५ विद्यापीठांचे प्रतिनिधी आणि भारत सरकारच्या शेती, व्यापार, उत्पादन व अर्थखात्याचे प्रतिनिधी उपस्थित होते. अ. भारतीय शैक्षणिक स्वरूपाची अशा तऱ्हेची ही ६ वी परिषद् आहे. ह्यापूर्वी १९५१ सालीं मानसशास्त्र आणि तत्त्वज्ञान ह्या विषयासंबंधीं अशा परिषदा भरविण्यांत आल्या होत्या. १९५३ सालीं हिंदी आणि इंग्लिश विषयासंबंधी आणि गेल्या फेब्रुवारींत इतिहासाविषयीं अशाच परिषदा भरविण्यांत आल्या होत्या.

### देशी भाषांतून तारा

हिंदी भारतीय भाषांतून अधिक प्रमाणांत तारा होऊं लागल्या आहेत. अहवालाच्या वर्षांत अशा भाषांतील १८,९३९ तारा करण्यांत आल्या. या भाषांतून तारा करण्याची व्यवस्था ५२४ कचेऱ्यांत आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठी कर्जे देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जे देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.

अेक ते दहा वर्षे मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.

१ वर्ष २ टक्के, २ वर्षे २॥ टक्के, ५ वर्षे ३ टक्के, ७ वर्षे ३॥ टक्के, १० वर्षे ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

दराबद्दल समक्ष चौकशी करावी.

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथे सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरी: भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,१०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

## सहकारी सप्ताहाचा मुंबईतील कार्यक्रम

### पं. नेहरू ह्यांच्या हस्तें उद्घाटन

मुंबई येथें ब्रेबर्न स्टेडियममध्यें दि. ११ रोजीं सकाळीं १०-४५ वाजतां सहकारी चळवळीच्या सुवर्णमहोत्सवाचें पं. जवाहरलाल नेहरू हे उद्घाटन करणार आहेत. सहकारी आणि ग्रामोद्योग प्रदर्शन उघडल्याचेंहि ते जाहीर करतील. हें प्रदर्शन त्या दिवशीं संध्याकाळीं ६ नंतर जनतेला खुलें राहील. त्यानंतर १७ एप्रिल अखेर तें उघडें असेल. "आर्थिक नियोजनांत सहकाराचें स्थान" ह्या विषयावर कावसजी जहांगीर हॉलमध्यें १२ एप्रिल रोजीं संध्याकाळीं ६ ते ८ श्री. मुरारजी देसाई ह्यांच्या अध्यक्षतेखालीं चर्चा होईल, त्यांत श्री. आर. जी. सरय्या, श्री. एस. के. पाटील, श्री. एन. एम. जोशी, श्री. अशोक मेहता, श्री. एम. आर. मसानी, श्रीमति हंसा मेहता व प्रो. द. गो. कर्वे हे भाग घेतील. १३ एप्रिल रोजीं संध्याकाळीं दामोदर हॉलमध्यें "सहकार" विषयावर नाटक होईल. बुधवारीं व गुरुवारीं रात्रीं हुसेनी बागेंत व टिळक स्मारक मंदिर विलेपार्ले येथें "सहकारा" वर गाणीं व फिल्म्स ह्यांचा कार्यक्रम होईल. १६ एप्रिल रोजीं कुर्ला येथें "जग काय म्हणेल" हें मराठी नाटक असून १७ एप्रिल रोजीं सप्ताहाची समाप्ति करमणुकीच्या कार्यक्रमांनीं होईल.

---

### दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

वरील बँकेनें १९५३ मध्यें ९६,७३२ रु. नफा मिळविला. रिझर्व्ह फंड २०,००० रु., इन्कमटॅक्स व सुपरटॅक्सची तरतूद ३३,००० रु., ४% डिव्हिडंड २८,५७२ रु., इन्व्हेस्टमेंट रिझर्व्ह ५,००० रु., रिझर्व्ह फॉर बॅड अँड डाउटफुल डेट्स १०,००० रु. अशी नफ्याची वाटणी डायरेक्टरांनीं सुचविली आहे. बँकेचें वसूल भांडवल ७,२७,०३५ रु., रिझर्व्ह व इतर फंड २,२९,८५९ रु., ठेवी ६५,६३,४८८ रु., रोख व बँकांत ११,५९,५२६ रु., इन्व्हेस्टमेंट्स २८,९४,२६८ रु., कर्जे ३५,१५,५८७ रु. असा ताळेबंदाचा तपशील आहे. (चेअरमन : जी. आर. साठे, मॅ. डायरेक्टर : सी. टी. चितळे, मॅनेजर : जी. डी. जोगळेकर)

---

### शिकॅगो येथील शास्त्रीय व औद्योगिक संग्रहालय

डिसेंबर १९५३ अखेर एका वर्षात हा संग्रहालय पहावयास २२,२०,८८१ प्रेक्षक आले. आज सर्व जगांत हा संग्रहालय मोठा आहे. दिनांक १३ डिसेंबर रोजीं एका दिवसांत सर्वात जास्ती (३६,२४१) प्रेक्षक आले. प्रेक्षक-तास यांचें निरीक्षण करण्यांत येते. प्रेक्षक तीन तासांहून एका वेळीं जास्ती वेळ राहिला म्हणजे तो पुन्हां येणार असें समजतात. अशा विशिष्ट प्रेक्षकांची संख्या सात लाखांचे वर होती. या ठिकाणीं प्रेक्षकांना अमेरिकेचें जीवनमान सर्व जगांत श्रेष्ठ कसें हें दृष्टोपत्तीस येतें. या सालांत ५४०६ शाळांचे २,३६,७२१ विद्यार्थी अभ्यासासाठी येथें आले होते. असोसिएटेड प्रेसचे ५०० चे वर चालकांनीं या संस्थेस भेट दिली.

---

### बँकांचें किमान वसुल भांडवल वाढवा!

शेड्यूल्ड बँक व बिगर-शेड्यूल्ड बँक ह्यांना किमान आवश्यक असलेल्या वसुल भांडवलाची व रिझर्व्हची रक्कम बरीच वाढविण्यांत यावी; त्याचप्रमाणें बिगर-शेड्यूल्ड बँका शेड्यूल्ड बँकांशीं अधिक प्रभावी रीतीनें संलग्न होण्याची व्यवस्था करण्यांत यावी, असें इंडियन बँक्स असोसिएशनचे अध्यक्ष, श्री. देवकरण नानजी, ह्यांनीं असोसिएशनच्या वार्षिक सभेंत सांगितलें.

### गरज लावून ठेवावयास नको

१ एप्रिल, १९५४ पासून मुंबईतील टेलिफोन वर्गणीदारांसाठीं एक नवीन व्यवस्था उपलब्ध होईल. कोणत्याहि सांगून ठेवलेल्या वेळीं वर्गणीदारांस फोन करण्याची व्यवस्था टेलिफोन खातें करील. वर्गणीदारांनीं ९९९ क्रमांकास फोन करून कोणत्या विशिष्ट टेलिफोनवर त्यांना कोणत्या वेळीं व कोणत्या दिवशीं फोन करावयास पाहिजे तें कळवून ठेवावें. ऑपरेटर पुनः एकदां फोन करून आपण नोंदून घेतलेला तपशील बरोबर आहे याची खात्री करून घेईल. मागाहून ठरलेल्या वेळीं त्या ग्राहकास सांगितल्याप्रमाणें फोन करण्यांत येईल. वर्गणीदारांना ही सोय फारच आवडेल असें वाटतें, कारण त्यामुळें कोणत्याहि कार्यक्रमाची त्यांना आठवण करून दिली जाईल आणि दिवसां वा रात्रीं कोणत्याहि वेळीं गाडी किंवा विमान गांठावयाचें असेल तर त्यांना वेळेवर सूचना मिळेल. या सोयीसाठीं नाममात्र आकार आहे. ९९९ क्रमांकास करावयाच्या फोनबद्दल कांहींहि आकार पडणार नाहीं आणि ठराविक वेळीं वर्गणीदारांस केलेल्या फोनबद्दल प्रत्येक कॉलला दोन स्थानिक कॉल इतका आकार घेण्यांत येईल. टेलिफोन खातें ही सेवा शक्य तितक्या तत्परतेनें व ठरविलेल्या वेळींच व्हावी याची काळजी घेईल. तरीपण यंत्रांतील बिघाडामुळें किंवा ऑपरेटरच्या चुकीमुळें ठराविक वेळीं फोन करावयाचें राहून गेल्याची जबाबदारी खात्यावर नाहीं.

---

### बँकिंग स्टाफ ट्रेनिंग कॉलेजसाठीं ब्रिटिश तज्ञ

मुंबई येथें भारत सरकार सुरू करीत असलेल्या बँकिंग स्टाफ ट्रेनिंग कॉलेजचे नियुक्त प्रिन्सिपॉल, मि. एफ्. एच. हेन, हे २० मार्च रोजीं भारताकडे येण्यासाठीं बोटीनें निघाले. त्यांच्या पाठोपाठ ११ एप्रिल रोजीं विमानानें मि. टी. एच. हार्वे हेहि निघणार आहेत. हे दोघेहि मिडलंड बँकेच्या ट्रेनिंग खात्यांतील अधिकारी असून कोलंबो योजनेच्या टेक्निकल को-ऑपरेशन योजनेनुसार ब्रिटिश सरकारनें भारतास उपलब्ध करून दिले आहेत.

---

### टेलिफोनच्या व्यवस्थेंत वाढ

स्थानिक व ट्रंक टेलिफोन व्यवस्थेंत गेल्या वर्षी वाढ करण्यांत आली. ४८ नवीं एक्सचेंजिस उघडण्यांत येऊन ६२ केंद्रांचा व्याप वाढविण्यांत आला. देशांत २,१८,६५३ टेलिफोन सध्यां चालू आहेत. ग्रामीण भागांत व जनतेसाठीं टेलिफोन्सची अधिक सोय करण्यांत आली. ४१६ सार्वजनिक टेलिफोनकचेऱ्या गतवर्षी उघडण्यांत आल्या असून, अशा कचेऱ्यांची संख्या आतां भारतांत २,२५८ आहे. १९५५ पर्यंत सर्व जिल्हाठाण्यांचे जागीं तोट्याचा विचार न करतां ट्रंक टेलिफोन व्यवस्था उपलब्ध झालेली असेल.

---

### ग्रामीण भागांत टपालाची सोय

१ एप्रिल, १९५३ ते ३१ जानेवारी, १९५४ या दरम्यान ग्रामीण भागांत १,२८२ टपालकचेऱ्या सुरू करण्यांत आल्या. शहरी भागांतहि ९० कचेऱ्या उघडल्या. २,००० व त्याहून अधिक वस्तीच्या सर्व खेड्यांतून टपाल कचेऱ्या उघडण्याचा संकल्प ३१ मार्च, १९५३ रोजीं पुरा झाला.

हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.